CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com



न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स, धुळे



डेली सर्व्हिस - इंदौर, मुंबई, पुणे, अहमदाबाद, नागपूर, अमरावती, अकोला

लग्न समारंभासाठी व शैक्षणिक सहलीकरिता 2x2 आकर्षक बसेस भाडेतत्वावर मिळतील.

2x1 A/C स्लीपर कोच

संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
द.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे



धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ५ थे | अंक : २० वा | शुक्रवार दि. २४ नोव्हेंबर २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६


## न्यूज कॉलम

### मनपाबाहेर आजाद समाज पार्टी साजरा करणार संविधान दिवस

**धुळे ।** आजाद समाज पार्टीच्या वतीने दि. २६ नोव्हेंबर रोजी महानगरपालिका धुळे येथील बाहेरील बाजूस सकाळी साडेदहा वा. संविधान दिवस साजरा करण्यात येणार आहे.या कार्यक्रमास आजाद समाज पार्टी उत्तर महाराष्ट्र कार्यकारणी, धुळे जिल्हा कार्यकारिणी, धुळे, साक्री, शिंदखेडा व शिरपूर तालुका सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व मित्रपरिवार यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे. संविधनावर प्रेम करणारे, मानणारे सर्व समविचारी पक्ष संघटना, व्यक्ती यांनी देखील या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आनंद लोंढे प्रदेश कार्याध्यक्ष,आझाद समाज पार्टी, उत्तर महाराष्ट्र संघटक अनिल ठाकूर उत्तर महाराष्ट्र महासचिव सुकलाल बैसाने, धुळे जिल्हाध्यक्ष पँथर आबासाहेब अमृतसागर यांनी केले आहे.

### गुटखा तस्करी करणारा ताब्यात

**धुळे ।** मध्य प्रदेश परिवहन मंडळाच्या बसमधून प्रतिबंधीत गुटख्याची तस्करी करणार्या मालेगाव येथील इसमावर सोनगीर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. या कारवाईत ३० हजार ५५ रूपये किंमतीचा गुटखा जप्त करण्यात आला.

# निकिता पाटीलची हत्या, दुसऱ्या दिवशी घराजवळ तरुण मृतावस्थेत, धुळ्यात खळबळ

**धुळे । प्रतिनिधी**





शहरातील नकाने रोड परिसरात काल रात्री एका २१ वर्षीय तरुणीची चाकूने गळा चिरून निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. निकिता कल्याण पाटील असं हत्या झालेल्या २१ वर्षीय तरुणीचे नाव असून राहत्या घरातच अज्ञाताने तिची गळा चिरून हत्या केली होती. धुळे शहरातील बालाजी नगर भागातील विघ्नहर्ता हॉस्पिटलच्या पाठीमागे पाटील कुटुंबीय राहतं. काल रात्री घरी कोणी नसल्याचे पाहून अज्ञात आरोपीने थेट घरात घुसून तरुणीची गळा चिरून हत्या केली होती. घटनेची माहिती मिळताच पोलिस श्र्वानपथकासह घटनास्थळी दाखल झाले होते.

आज सकाळच्या सुमारास पोलिसांनी दोन पथकं तयार करून आरोपीचा शोध घेण्याचा प्रयत्न करत होते. मात्र, निकिता पाटीलच्या घराच्या काही अंतरावरच काटेरी झुडपांमध्ये एका तरुणाचा देखील मृतदेह आढळून आला आहे. प्रथमदर्शनीय या तरुणाने विष प्राशन करून आत्महत्या केल्याचे समजते. या तरुणाच्या अंगावर देखील रक्ताचे डाग असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर तरुणाविषयी पोलिसांनी अधिक माहिती जाणून घेतली आणि या तरुणाचे नाव अनिकेत बोरसे असून हा तरुण निकिता पाटीलशी संबंधित होता अशी प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली आहे. प्रथमदर्शनी याच तरुणाने निकिता पाटील या तरुणीचा खून केला असावा असा अंदाज पोलिस व्यक्त करत आहेत. मात्र, जोपर्यंत सखोल तपास करून सदर घटनेचा तपास लागत नाही, तोपर्यंत अधिक तपास सुरू असणार असल्याची माहिती उपविभागीय पोलिस अधिकारी सचिन हिरे यांनी यावेळी दिली. त्यामुळे सदर तरुणी निकिता पाटील आणि अनिकेत बोरसे यांच्यामध्ये प्रेम संबंध होते आणि त्यातूनच निकिता पाटील हिचा खून आणि मग अनिकेत बोरसे याची आत्महत्या झाली असावी, असा अंदाज देखील या निमित्ताने व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, या हत्येमागे प्रेमाचा त्रिकोण असल्याची थेअरी देखील मांडली जात आहे. दि २२ सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास निकीता कल्याण पाटील (२१) या तरुणीची तिच्या राहत्या घरी धारदार शस्त्राने निर्घून हत्या करण्यात आली. घरात ती एकटी असल्याने डाव साधून तिच्या मानेवर कसायासारखे वार करण्यात आले. यात ती जागीच गतप्राण झाली. घरासमोर राहणार्या व्यक्तिने ही माहिती दिल्यानंतर तिच्या कुटुंबियांना हा प्रकार कळला. प्रेमसंबंधाला नकार दिल्याने आपल्या बहिणीची हत्या झाल्याचे निकीताचा भाऊ अनिकेत कल्याण पाटील याने पोलिसांना दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. महेश मराठे हा बहिणीचा सातत्याने पाठलाग करत होता. प्रेमसंबंधासाठी त्याने तगादा लावलेला होता. त्याला नकार दिल्याने त्याने बहिणीचा खून केल्याचा संशय व्यक्त केला होता. घटनेनंतर महेश मराठे फरार झाल्याने त्याच्यावरील संशय आणखी गडद झाला. परंतु, आज सकाळी खुनाच्या स्थळापासून हाकेच्या अंतरावर अनिकेत वाल्मिक बोरसे (२६) रा. महाले नगर, मोगलाई, धुळे याचा मृतदेह आढळून आला. त्यामुळे पोलिसही चक्रावले आहेत.

**पोलिसांची घटनास्थळी भेट!**

**अनिकेत बोरसे याचा मृतदेह आढळल्यानंतर पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली होती. अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, एलसीबी पीआय दत्तात्रय शिंदे, देवपूर पोलीस ठाण्याचे पीआय सतिष घोटेकर, पश्चिम देवपूर पोलीस ठाण्याच्या पीआय संगिता राऊत, डॉग स्कॉड, फॉरेन्सीक पथकाने घटनास्थळाची पहाणी केली. यावेळी अनिकेतच्या मृतदेहाजवळ मोबाईल, सायकल तसेच विषाची बाटली पोलिसांना आढळून आली. तर काल निकिताच्या खुनानंतर चाकू घटनास्थळीच आढळला होता. त्यामुळे या दोन घटनांचा परस्पर काही संबंध आहे का, या दिशेने पोलिसांनी तपासाला वेग दिला आहे.**

**निकीता पाटील या तरुणीच्या खुनानंतर काही अंतरावरच काल सकाळी अनिकेत बोरसे या तरुणाचा मृतदेह आढळला आहे. त्याच्याजवळ किटकनाशकाची बाटली देखील आढळली असून त्याने आत्महत्या केल्याचे दिसत आहे. त्यामुळे खुन आणि आत्महत्या या दोन्ही घटनांचा काही परस्पर संबंध आहे, या दिशेने पोलिसांनी तपास सुरु केला आहे. – किशोर काळे, अपर पोलीस अधिक्षक, धुळे**

# सृष्टीच्या कणाकणात शिवाचा अंश समाविष्ट आहे





### पंडित प्रदीपजी मिश्रा यांचे प्रतिपादन

**नाशिक । प्रतिनिधी**

प्रभू श्री रामाच्या पावन भूमीत, गोदावरी नदीच्या तिरी होत असलेल्या शिवमहापुराण कथा हे नाशिकरांनी महादेवाला अर्पण केलेला एक लोटा जलचाच प्रसाद आहे की, आज नाशिकच्या पावन भूमीत कथा संपन्न होते आहे. दरम्यान सृष्टीच्या कणाकणात शिवाचा अंश समाविष्ट आहे असे प्रतिपादन पंडित प्रदीपजी मिश्रा यांनी केले.

पंडित प्रदीपजी मिश्रा यांनी आयोजकांना तयारीसाठी आठ दिवसांपेक्षा कमीचा कालावधी दिला असताना आणि या वेळेत आयोजकांनी केलेल्या तयारीबद्दल पालकमंत्री दादाजी भुसे, आविष्कार भुसे, राजू लवटे, अजय बोरस्ते, प्रवीण तिदमे, प्रशांत जाधव, रंजन ठाकरे व आयोजन समितीचे विशेष कौतुक केले. नाशिक पंचक्रोशीतून शिव महापुराण कथा ऐकण्यासाठी आलेल्या भाविकांमुळे पाथर्डी गाव व परिसरात कुंभमेळ्याचे स्वरूप आले आहे, प्रामुख्याने महिलांची संख्या लक्षणीय दिसत आहे.युवकांनी कोणतेही व्यसन न करता योग्य दिशेने वाटचाल केल्यास निश्र्चितच यश मिळेल, महिलांनी गृहस्थ काळात योग्य वेळेला आलेल्या सूनेकडे घराची जबाबदारी देऊन शिवभक्ती करावी, असे आवाहन पंडितजींनी कथेच्या तिसऱ्या दिवशी केले. तसेच मनुष्य आयुष्यात सर्व गोष्टींना वेळ देतो, पण आयुष्यात जेव्हा कठीण प्रसंग येतो तेव्हा फक्त शिवमहादेवच मदतीला येतो, आपले कर्मच मदतीला येते त्यामुळे थोडा वेळ शिवमहादेवाच्या सेवेला द्यावा असेही पंडितजींनी सांगितले.

# महाक्रिटीकॉन २०२३ राज्यस्तरीय परिषद आजपासून नाशकात




### आपत्कालीन उपचाराबाबत तीन दिवसीय परिषदेत तज्ञ करणार मार्गदर्शन

**नाशिक । प्रतिनिधी**

इंडियन सोसायटी ऑफ क्रिटीकल केअर मेडिसिन (आयएससीसीएम) यांच्या नाशिक शाखेच्या वतीने अकराव्या महाक्रिटीकॉन २०२३ या राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन केले आहे. येत्या २४ ते २६ नोव्हेंबर दरम्यान हॉटेल एक्स्प्रेस इन येथे ही परिषद पार पडणार असून, आपात्कालीन परीस्थितीतील उपचारांबाबत तज्ज्ञ मार्गदर्शक कार्यशाळा व व्याख्यान, समूह चर्चेतून मार्गदर्शन करणार आहेत. 'कोलॅबरेटिव्ह ट्रासफॉर्मेशन इन क्रिटिकल केअर मेडिसिन' अशी या परिषदेची संकल्पना असल्याची माहिती आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ.यतिंद्र दुबे, समितीचे सचिव डॉ.पंकज राणे यांनी दिली.

या परिषदेसाठी आयएससीसीएम नाशिकचे अध्यक्ष डॉ. दिनेश वाघ, सचिव डॉ.रुचिरा खासणे, महाक्रिटीकॉनचे सायंटिफिक कमिटीचे अध्यक्ष डॉ.देवदत्त चाफेकर, खजिनदार डॉ.हितेंद्र महाजन तर आयोजन समिती सदस्य डॉ.अभिनंदन मुथा, डॉ.भाविक शाह, डॉ.मकरंद राणे, डॉ.महेश बनसोड, डॉ.स्वप्निल साखला, डॉ.विलास कुशारे हे परीश्रम घेत आहेत.

या परिषदेअंतर्गत २४ नोव्हेंबरला विविध विषयांवरील कार्यशाळा पार पडणार आहेत. काही कार्यशाळा परिषद स्थळ असलेल्या एक्स्प्रेस इन येथील विविध सभागृहांमध्ये पार पडतील. तर प्रात्यक्षिकांवर आधारित काही कार्यशाळा या थेट आयसीयूतून प्रक्षेपित केल्या जातील.२५ नोव्हेंबरला सकाळी नऊ वाजेपासून सत्रांना सुरुवात होईल. तर या दिवशी सायंकाळी सहा वाजता परिषदेचा औपचारीक उद्घाटन सोहळा पार पडणार आहे. त्यानंतर २६ नोव्हेंबरलाही विविध सत्रांवरील परिसंवाद पार पडतील.

# नळ चोरणारे दोघे ताब्यात: पोलिसांनी दोघांना शिताफीने केली अटक, चोरीचे १५० नळ जप्त

**धुळे । प्रतिनिधी**

शहरातील रिक्रिएशन गार्डनजवळील हार्डवेअरच्या दुकानाचा पत्रा उचकटून ६० हजार रुपयांचे महागडे नळ चोरणाऱ्या दोघांना शहर पोलिसांनी शिताफीने अटक केली. त्यांच्याकडून चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. न्यायालयाने दोघांची दोन दिवस पोलिस कोठडीत रवानगी केली.

तालुक्यातील ताजपुरी येथील रहिवासी प्रदीप किशोर शिरसाठ यांचे शहरातील रिक्रिएशन गार्डनजवळ बजरंग हार्डवेअर नामक दुकान आहे. या दुकानाचा पत्रा उचकटून चोरट्यांनी १५० नळ चोरून नेले होते. या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणी पोलिस निरीक्षक अन्साराम आगरकर यांना शहरातील पाच कंदीलकडून खंडेराव मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर दोन तरुण पिशव्यांमध्ये नळ घेऊन आल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी दोघांना शिताफीने अटक केली. त्यात सूर्यकांत तथा सोनू चंद्रकांत कलाल (वय २४, रा. रामसिंह नगर, शिरपूर) व सतीश गोविंद महाजन (वय ३८, रा. वरवाडे, शिरपूर) यांचा समावेश आहे. त्यांच्याकडून चोरीचे १५० नळ जप्त करण्यात आले. ही कारवाई पोलिस अधीक्षक संजय बारकुंड, अप्पर पोलिस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलिस अधिकारी सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक ए. एस. आगरकर, उपनिरीक्षक संदीप मुरकुटे, शोध पथकाचे हवालदार ललित पाटील, पोलिस नाईक रवींद्र आखडमल, हवालदार विनोद आखडमल, गोविंद कोळी, योगेश दाभाडे, प्रशांत पवार, मनोज दाभाडे, भटू साळुंखे, सचिन वाघ, मनोज महाजन, आरिफ तडवी, विजय पाटील यांनी केली.

# वाहनचालकाला मारहाण करणाऱ्या पोलिसांवर कारवाई करण्याची मागणी

### न्यायालयात जाण्याचा स्वराज्य वाहनचालक संघटनेचा इशारा

**धुळे । प्रतिनिधी**




महामार्गावर एका वाहनचालकाला काही पोलीस मारहाण करीत असल्याचा व्हीडीओ गेल्या आठवड्यात सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या व्हिडिओमधील मारहाण करणाऱ्या पोलिसांवर कारवाईची मागणी जिल्हाधिकारी व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना निवेदन देऊन केली आहे. परंतु आठ दिवसात संबंधित पोलिसांवर कारवाई न झाल्यास न्यायालयात जाऊन दाद मागणार असल्याचा इशारा स्वराज्य वाहनचालक संघटनेतर्फे धुळे जिल्हा व सत्र न्यायालय येथील ॲड. डी.सी. राठोड यांनी गुरुवारी पत्रकार भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेतून दिला आहे.

याप्रसंगी स्वराज्य वाहनचालक संघटना पुणेचे संस्थापक गुरुकट्टी, राज्य उपाध्यक्ष महादेव बडदे, सचिव रवींद्र बिराजदार, धुळे जिल्हा सदस्य निर्मल जैन, शहर उपध्यक्ष किशोर बदने, दत्तात्रय गांडूळे, लोणी प्रवरा, अरुण खेडकर, उल्हासनगर, रवींद्र पवार, कळवण, पत्रकार संघाचे उपाध्यक्ष मनोज गर्दे, सचिव सचिन बागुल यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते. ॲड. राठोड म्हणाले की, १७ नोव्हेंबर रोजी हा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. यात काही पोलीस वाहनचालकाला अडवून मारहाण करीत असल्याचे दिसत आहे. त्यापैकी दोन वाहतूक पोलीस कर्मचारी तर इतर दोन खाकी वर्दीत दिसत आहेत. ही मारहाण अत्यंत अमानुषपणे केली गेली आहे. वाहनचालकांची काही चुकी असल्यास त्यास अटक करून पोलिसात दंडात्मक अथवा गुन्हा दाखल करण्याची कारवाई करता येते. मात्र पोलिसानी वाहनचालकाला मारहाण करणे हे बेकायदेशीर आहे. मारहाण करण्याचा पोलिसांना अधिकार नाही. त्यामुळे या व्हिडिओतील पोलिसांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी जिल्हाधिकारी व वरिष्ठ पोलीस अधिकारींकडे निवेदन देऊन केली आहे. परंतु आठ दिवसात कारवाई झाली नाही तर यासाठी न्यायालयात जाऊन दाद मागणार असल्याची भूमिका ॲड राठोड यांनी मांडली. या व्हिडीओमुळे पोलीस दलाची प्रतिमा मालिन झाली असून आर्थिक गणिते जुळून न आल्यामुळे ही मारहाण करण्यात आल्याचे दिसते असाही अंदाज ॲड. राठोड यांनी वर्तविला.

# महायुतीचा उमेदवारच विजयी होणार : चंद्रशेखर बावनकुळे यांचे प्रतिपादन

### महाविजय अभियानात नंदूरबार लोकसभा प्रवास

**नंदुरबार । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पात साथ देण्यासाठी २०२४ च्या निवडणुकीनंतर नंदुरबारचा खासदार लोकसभेत त्यांच्या समर्थनात हात उंचावेल. नंदूरबारमधून महायुतीचा उमेदवारच विजयी होणार आहे, असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आमदार श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. पंतप्रधान मोदी यांनी स्वातंत्र्याच्या अमृतकाळात आत्मनिर्भर भारताचा संकल्प केला आहे.

नंदुरबार लोकसभा मतदारसंघ प्रवासात त्यांनी अक्कलकुवा, शहादा, नंदूरबार, नवापूर आणि साक्री विधानसभा क्षेत्रातील भाजपा सुपर वॉरिअर्सशी संवाद साधला. ते म्हणाले, देशातील नागरिकांना सन्मान मिळावा यासाठी पंतप्रधान मोदी प्रयत्न करीत आहेत. यामुळेच आदिवासी समाजातील महिला देशाच्या राष्ट्रपती पदापर्यंत पोहचू शकली. मोदी सरकारने मागील ९ वर्षात जेवढी कामे केली तेवढी त्यांच्या पूर्वीच्या कॉंग्रेस सरकारने केली नाही. ही कामे जनतेमध्ये घेऊन जाण्याचे काम भाजपा कार्यकर्त्यांनी करावे. राज्यातील महायुती सरकारने जनकल्याणाच्या विविध योजना राबविल्या आहेत. त्याचाही प्रचार प्रसार जनतेपर्यंत करावा. या वेळी यावेळी आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावित, खा. हिनाताई गावित, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, जिल्हाध्यक्ष नंदुरबार निलेश माळी, प्रभारी तथा भाजपा मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, नंदुरबार जिल्हा परिषद अध्यक्ष सुप्रिया गावित, आमदार राजेश पाडवी, दीपक बापू पाटील, राजेंद्र गावित, तुषार रंधे, अजय भोळे, नागेश पाडवी, कैलास चौधरी, महेंद्र पाटील, मोहन सूर्यवंशी, कुशल चौधरी, सौ. शाजूबाई वळवी, निकेश राजपुत, अर्जुन मराठे यांच्यासह मोठ्या संख्येने भाजपा सुपर वॉरिअर्स आणि प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

**घर चलो अभियानात सर्वत्र मोदी-मोदी**

**प्रदेशाध्यक्ष श्री बावनुकुळे यांनी नंदुरबार येथे दादा गणपती ते जळका बाजार पर्यंत घर चलो अभियानात सहभाग नोंदविला. या अभियानाच्या माध्यमातून त्यांनी सर्वसामान्य जनता व व्यापाऱ्यांशी संवाद साधला. पुढचे पंतप्रधान कोण, असा प्रश्न विचारल्यावर सर्वत्र मोदी-मोदी असा घोष व्यापारी व नागरिकांनी केला. नंदूरबार शहरातील मान्यवरांच्या घरी स्नेह भेट देवून, मोदी सरकारच्या विविध योजनांची माहिती दिली.**

**भाजपाकडून भुजबळांना ऑफर नाहीच - छगन भुजबळ यांना भाजपाकडून कुठलीही ऑफर नाही. ते अजित दादांसोबत आहेत व सरकारमध्ये मंत्री आहेत. आमच्याकडे येऊन त्यांना काय मिळणार, त्यांनी अशी कोणतीही चर्चा केली नाही.**



**सर्वपक्षीय मराठा नेत्यांनी एकत्र यावे**

**ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण द्यावे, अशी भूमिका मांडली आहे. मराठा समाजाच्या नेत्यांनी एकत्र यावे व सरकारसोबत बसून वेगळ्या जास्तीत जास्त लाभ मिळविण्यासाठी पुढाकार घ्यावा. कुठल्याही समाजाचे आरक्षण कमी न करता मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय मुख्यमंत्री शिंदे यांनी सर्वपक्षीय बैठकीत घेतला त्यास सर्वांचे समर्थन आहे. मुख्यमंत्री शिंदे लवकरच असा निर्णय करतील की ज्यातून हा सामाजिक संघर्ष एका मिनिटात नष्ट होईल, असा मला विश्वास आहे.**

# पाथर्डी परिसरात बिबट्या जेरबंद

**इंदिरानगर । प्रतिनिधी**

पाथर्डी परिसरातील गट नंबर २१६ मध्ये संजय गंगाराम नवले यांच्या मळ्यात वनविभागाकडून लावण्यात आलेल्या पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद झाला आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निश्र्वास सोडला आहे.

मागील पंधरा-वीस दिवसांपासून बिबट्या या परिसरात फिरत होता. त्यामुळे मळेधारकांनी व ग्रामस्थांनी याची कल्पना वनविभागाला दिली होती. वनविभागानेही बिबट्याच्या पायाचे ठसे लक्षात घेऊन पिंजरा लावलेला होता. तरीही मळे परिसरात राहत असलेल्या शेतकऱ्यांना बिबट्याची भीती जाणवत होती. त्यामुळे वनविभागाने गांभीर्याने ही बाब लक्षात घेऊन त्याच्यावर पाळत ठेवली होती. तसेच या भागातील बरेच (मनुष्यवस्ती) शेतकरी मळे भागात राहत असल्याने त्यांच्या लहान मुलांना शाळेत जावे लागते. तसेच महिलांना दिवसभरात शेतामध्ये काम करावे लागते. त्यामुळे बिबट्याच्या हल्ल्याची भीती मळेभागात राहणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पसरली होती. त्याच अनुषंगाने वनविभागाने दोन-तीन दिवसांपूर्वी नवले यांच्या मळ्यात पिंजरा लावला होता. दरम्यान, बिबट्याला पकडण्यासाठी वनविभागाचे विजय पाटील, अनिल अहिरराव, अशोक खानझोडे व इतर सहकाऱ्यांनी महत्वाची भूमिका बजावली. तर वनविभागाने बिबट्याला जेरबंद केल्याने मळेधारक शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

## पाणीप्रश्न मिटणार की पेटणार ?

पाण्यावर सगळ्यांचा समान हक्क ही भूमिका सर्वमान्य असताना टंचाई असलेल्या भागाला पाणी देण्यावरून संघर्ष होणे दुर्दैवी आहे. दुष्काळाच्या संकटात हा वाद अधिक तीव्र होणार नाही याची काळजी सर्वांनी घ्यायला हवी.

गेल्या दोन अडीच महिन्यांपासून मराठवाडा आणि नगर-नाशिक जिल्ह्यात पेटलेला पाणीप्रश्न सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने तरी सुटणार की नाही याविषयी शंका आहे. नगर-नाशिकमधील धरणातील पाणी जायकवाडी धरणात सोडण्याच्या प्रश्नावरील अर्जावर परवा सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली, नगर-नाशिकमधील कारखानदारांनी जायकवाडीत पाणी सोडण्याच्या आदेशाला स्थगिती देण्याची केलेली मागणी न्यायालयाने अमान्य केली. त्यामुळे किमान सध्यातरी या दोन जिल्ह्यांतून जायकवाडी धरणात पाणी सोडण्याचा मार्ग खुला झाला आहे. यावर्षी समाधानकारक पाऊस न झाल्याने राज्यातील सर्वच धरणांतील पाणीसाठे कमालीचे घटले आहेत. मराठवाड्यातील धरणात तर केवळ ३७ टक्क्यांच्या आसपास पाणीसाठा उपलब्ध आहे. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने समन्यायी पाणीवाटप नियमानुसार जायकवाडी धरणात ८.६० टीएमसी पाणी सोडण्याचे आदेश महिनाभरापूर्वी दिले होते. त्यानुसार १५ ऑक्टोबरपर्यंत जायकवाडी धरणात पाणी सोडणे अपेक्षित होते. मात्र त्या दरम्यान या आदेशाच्या विरोधात नगर-नाशिकमध्ये आंदोलने सुरू झाल्याने या निर्णयाची अंमलबजावणी झाली नाही. नगर-नाशिकमधील कारखानदारांच्या वतीने उच्च न्यायालयात या अर्जावर सुनावणी झाली तेव्हा जायकवाडी धरणात पाणी सोडण्यास न्यायालयाने स्थगिती न देता जायकवाडीत नगर-नाशिकमधील धरणातून पाणी सोडण्याचा निर्णय कशाच्या आधारे घेतला, याविषयीचे स्पष्टीकरण मागवले. अर्जदारांच्या वतीने यासंदर्भातील मेंढेगिरी समितीच्या अहवालाच्या आधारे महाराष्ट्र जलसंपदा विभागाने २०१४ च्या आदेशाची अंमलबजावणी करू नये आणि प्राधिकरणाचा फेरनिर्णय येत नाही तोवर समन्यायी पाणीवाटपाच्या सूत्रानुसार पाणी सोडण्यात येऊ नये अशी मागणी करण्यात आली. २०१४ मध्ये जलसंपदा विभागाने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वाचा फेरआढावा वेळोवेळी घेण्यात यावा, असे उच्च न्यायालयाचेच आदेश होते, असा युक्तिवाद अर्जदारांच्या वतीने उच्च न्यायालयात करण्यात आला होता.

सार्वत्रिक समस्या

सध्या नोव्हेंबर महिना सुरू असून, या काळात धरणातील पाणीसाठा शंभर टक्के अपेक्षित असताना तो खूपच कमी झाला आहे. त्यातही नगर-नाशिक जिल्ह्यातील धरणातून ८.६० टी.एम.सी. पाणी सोडल्यास या जिल्ह्यांनाही पाणीटंचाईला तोंड द्यावे लागणार आहे. यावर्षी पावसाळ्यात नगर जिल्ह्यात ४१० मिलिमीटर पाऊस झाला. त्यातही धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जास्त तर लाभक्षेत्रात कमी अशी स्थिती आहे. जिल्ह्यातील १२ तालुक्यांतील ९६ महसूल विभागांत दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. अनेक ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा होत आहे. एकूणच वर्षभराचे पाणी नियोजन करणे हे प्रशासनापुढील मोठे आव्हान आहे. त्यामुळे जायकवाडीत पाणी सोडण्यास विरोध होत आहे. मराठवाड्यातील पाणीटंचाईचा विषय या वर्षापुरताच नाही किंबहुना ही समस्या केवळ या तीन जिल्ह्यांपुरती किंवा राज्यापुरतीच सीमित नाही. जिल्ह्या-जिल्ह्यात आणि राज्या-राज्यात पाणी-वाटपाचे तंटे सुरू आहेत. पाणी टंचाईची समस्या ही सामान्यतः दरवर्षी पडणार्‍या मान्सूनवर अवलंबून आहे. देशाच्या विविध भागांत पाऊसमान अनियमित असते. पाऊस लवकर दाखल झाला किंवा उशिरा दाखल झाला तरी त्याचे भयंकर परिणाम संभवतात. काही भागात अति पाऊस तर काही भागात दुष्काळ अशी विचित्र परिस्थिती पाहायला मिळते. दुष्काळाचे दृष्य परिणाम पाणीटंचाई, चाराटंचाई आणि कृषि उत्पादन यांमधून पाहायला मिळतात. दुष्काळ आणि पाणीटंचाईवर मात करण्यासाठी जलसाक्षरता, जल संवर्धन, पाणीवाटप, पाणी साठवण्याबाबत प्रबोधन या मार्गाचा अवलंब करावा लागेल. पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवला पाहिजे. पाण्याचा अतिरिक्त वापर टाळला पाहिजे. पावसाचा अनियमितपणा आपण थांबवू शकत नाही. मात्र पाणी साठवणे, जपून वापरणे एवढे तरी आपल्या हाती आहे, ते तरी आपण करू शकतो. राज्यात सध्या आरक्षणाच्या मुद्दयावर राजकारण तापले असताना आता पाणी प्रश्नावरून मराठवाडा विरूद्ध नाशिक-नगर जिल्हे असा संघर्ष सुरू राहिला तर परिस्थिती आणखी बिकट होईल.

# संशोधन क्षेत्रात भारताची भरारी – भारताची पेटंट भरारी !

## भारतीय विद्यापीठे बळकट करण्यासाठी इनोव्हेशन इकोसिस्टमची गरज...



पेटंट बौद्धिक संपदा हे मानवी विकास, समाज देशाची सर्वांगीण प्रगती यांत अतिशय महत्वाची भूमिका बजावते. संशोधन व पेटंट यांच्यामुळे देशाची संबंधित कंपनी व संशोधक ह्यांची आर्थिक प्रगती साध्य होत असते. नवनवे शोध लावणे व त्यांचे पेटंट सादर होणे हे मानवी प्रगतीचे क्षण मानले जाते. जीनिव्हा येथे मुख्यालय असलेल्या जागतीक बौद्धिक संपदा संघटनेने (विपो- वर्ल्ड इंटलेक्चुअल प्रॉपर्टी ऑर्गनायझेशन) ने 'वर्ल्ड आय. पी. इंडिकेटर २०२३' हा अहवाल जाहीर केला असून, यात भारत पेटंट क्षेत्रात कशी भरारी घेतोय, हे चित्र स्पष्ट झाले आहे.

गतवर्षीच्या तुलनेत ३१.६ टक्क्यांची वाढ : भारतीय पेटंट कार्यालयाने या आर्थिक वर्षात १५ नोव्हेंबरपर्यंत ४१,०१० पेटेट मंजुर केले आहे. नावीन्यपूर्ण ज्ञानाच्या अर्थव्यवस्थेच्या दिशेने आपली वाटचात असुन या प्रवासातील हा मैलाचा दगड आहे. पेटंट हा एक कायदेशीर दस्तऐवज आहे जो एखादा व्यक्तिला किंवा संस्थेला अविष्काराचा अनन्य वापर करण्याचा अधिकार नवनिर्मितीला चालना देण्यासाठी भारत सरकारने पेटंट अर्जाच्या प्रक्रियेत सुधारणा करण्याबरोबरच पेटंट प्रक्रिया सुलभ आणि वेगवान केलेली आहे.

पेटंट अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया दोन मुख्य श्रेणीत विभाजित होते. एक म्हणजे भारतीय रहिवासी अर्थात निवासी श्रेणी , यात भारतात नोंदणीकृत आणि भारतात कामकाज, संशोधन करणाऱ्या कंपन्या आणि भारतात राहुन संशोधन करणारे भारतीय संशोधक यांचा समावेश होतो. दुसरी श्रेणी विदेशातील कंपन्या व संशोधक यांची अनिवासी श्रेणी .आपल्या संशोधनांना, उत्पादनांना भारतीय कायद्यांतर्गत बौद्धिक संपदेचे कवच मिळविण्यासाठी अर्ज करणाया विदेशी कंपन्या या विदेशी संशोधक यांची ह्या अनिवासी श्रेणीत समावेश होतो. २०२२ ह्या वर्षात भारतात एकुण ७७ हजार ६८ अर्ज पेटंटसाठी दाखल करण्यात आले,यातील सर्वात महत्त्वाची व उल्लेखनीय बाब म्हणजे आजवर अनिवासी श्रेणीतील अर्जाची संख्या ही नेहमीच निवासी श्रेणीतील अर्जापेक्षा अधिक असायची. २०२२ मध्ये पहिल्यांदा निवासी अर्जाची संख्या ही अनिवासीपेक्षा अधिक आहे. भारतात पेटंट अर्ज दाखल करण्याच्या क्षेत्रात एका अर्थाने भारतीयांनी विदेशी कंपन्या व संशोधक यांच्यावर मात केली आहे. हे आजवरच्या पेटंट इतिहासात पहिल्यादांच घडले आहे.

२०२२ मध्ये, अनिवासी फाईलींगचे प्रमाण एकुण अर्जाच्या तुलनेत ७८.२६ टक्के आणि भारतीय अर्जदारांचे २१.८३ टक्के असे प्रमाण होते. सदर आकडेवारीमधील बदल हा नक्कीच सुखद धक्का असुन आश्वासक आहे. २०२२ नंतर एकूण अर्जाच्या तुलनेन भारतीय अर्जदारांच्या अर्जाचे प्रमाण आता ५०.०५ टक्के इतके आहे तर विदेशी अर्जदारांचे प्रमाण ४९.९७ टक्के इतके आहे.

या आकडेवारीच्या आणखी खोलात जाऊन अभ्यास केल्यास भारतीय अर्जांमधील वाढ अधिकच लक्षणीय आहे, ही एक मोठी उपलब्धीच असल्याचे स्पष्ट होते. भारतातील निवासी श्रेणीतील पेटंट अर्जांमध्ये २०२१ च्या तुलनेन २०२२ मध्ये तब्बल ४७ टक्के वाढ झाली आहे. २०२१ मध्ये निवासी श्रेणीतील पेटंट अर्जाची संख्या २६ हजार २६७ इतकी होती ती २०२२ मध्ये ३८ हजार ५५१ इतकी वाढली याउलट, त्याच कालावधीत अनिवासी अर्ज श्रेणीत फक्त ९ टक्के वाढ झाली आहे.

भारतीय अर्जदारांचे पेटंटसाठी अर्ज करण्याच्या क्षेत्रातील हे नववर्चस्व देशातील परिपक्व होत असलेल्या नवोपक्रमाच्या परिसंस्थे (इनोव्हेशन इकोसिस्टम) ला अधोरेखित करते. तसेच मध्यम-उत्पन्न असलेल्या विविध देशांच्या अर्थव्यवस्थामध्ये भारताचे स्वतंत्र्य मानाचे स्थान निर्माण करते. या नाविन्य पूर्णतेला चालना देण्यात भारतीय विद्यापीठांची महत्वाची भूमिका असुन जागतिक क्रमवारीत त्यांनी मिळवलेल्या सन्मानजनक स्थानामुळे ही भूमिका अधोरेखित होतेय.

महाराष्ट्र पेटंटच्या क्षेत्रात आघाडीवर..

महाराष्ट्र पेटंटच्या क्षेत्रात आघाडीचे राज्य आहे. ही आघाडी कायम राहावी आणि राज्यातील विद्यापीठे या क्षेत्रात अग्रणी व्हावीत म्हणून राज्यातील अनेक विद्यापीठ,कुलगुरू व त्यांचे वरिष्ठ अधिकारी यांनी पुढाकार घेतला पाहीजे. एकंदरीत त्यांच्याशी संवाद साधला असता पेटंट बदल निराशाची स्थिती जाणवली. बहुसंख्य विद्यापीठे व शैक्षणिक संख्या केवळ कागदावर असे इनोव्हेशन केंद्र स्थापन करून एखाद्या प्राध्यापकाला कागदोपत्री जबाबदारी देण्यात आली आहे. मात्र हे केंद्र चालवण्यासाठी पेटंट क्षेत्रातील जाणकाराची, आयपी लीगल फर्म्सची सेवा घेण्यात न आल्याने या केंद्राची कोणताही प्रभाव व उपयुक्तता पाहायला मिळत नाही. त्यामुळे महाराष्ट्र सरकारने राज्यातील सर्व विद्यापीठामधील इनोव्हेशन व इनक्युबेशन केंद्राच्या कामागिरीचा आढावा घेऊन एक सखोल अहवाल जाहीर करायला हवा.

क्यूएस वर्ल्ड युनिव्हसिटी रँकिंगचा सखोल अभ्यास केला आणि त्यांनी भारतातील शीर्षस्य ९०० विद्यापीठांना दिलेले गुण अभ्यासले तर भारतीय विद्यापीठांमध्ये अनके सुधारणा आवश्यक आहे हे लक्षांत येते.

भारतीय विद्यापीठे त्यांची 'इनोवेशन इकोसिस्टम' बळकट करण्यासाठी काय करू शकतात यावरील मुख्य सुचना पुढीलप्रमाने:

उद्योग - शिक्षण क्षेत्र सहकार्य मजबुत करा :

वास्तविक जगातील आव्हानांना तोंड देण्यासाठी भारतीय विद्यापीठे व शिक्षण संस्था ह्यांनी उद्योग भागीदारासह संशोधन प्रकल्प राबवावे यासाठी सरकारने व शिक्षण क्षेत्रातील नेतृत्वाने प्रोत्साहन आणि सुविधा द्यायला हवी.

शिक्षण क्षेत्राचा उद्योगांशी संवाद सुलभ करण्यासाठी आणि परस्पर फायदेशीर भागीदारी वाढवण्यासाठी समर्पित 'उद्योग संपर्क कार्यालये '(इंडस्ट्री लायझनिंग ऑफिस ) स्थापन करण्यात यावे.

आंतरविद्याशाखीय संशोधनाला चालना द्या:

विद्यापीठामध्ये आंतरविद्याशाखीय संशोधन केंद्र तयार करायला हवी. ही केंद्रे समाज आणि देशापुढील क्लिष्ट समस्या वा आव्हानांवर तोडगा शोधण्यासाठी संशोधन कार्य करतील.

संशोधकानी त्यांच्या पारंपारिक शैक्षणिक क्षेत्राच्या पलीकडे जाऊन संशोधन करण्यासाठी विविध तज्ञ व्यक्ती वा संस्था यांच्याशी भागीदारी करावी यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे.

**डॉ. अमोल पोतगंटवार,**
**प्राध्यापक, संदीप इन्स्टिटयूट ऑफ टेकनॉलॉजी अँड रीसर्च सेंटर,नाशिक**

# मराठवाड्यात आरक्षणाच्या सभेसाठी चढाओढ



शेजारच्या घरात आग लागली तर आपलेही घर जळू शकते, हे ज्यांना कळते तो हुशार, असा एक समज आहे. हे न समजण्याइतपत कोणीही 'शहाणा' राहिलेला नाही, असे असताना मराठवाड्यातूनच मराठा समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा का पेटला? असा सवाल आता उपस्थित होत आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावरून मराठवाड्यात होत असलेल्या राजकीय नेत्यांच्या सभा कुठेतरी रोखणे गरजेचे आहे, हे राज्य शासनाला कधी कळेल? असा सवाल मराठवाड्यातील सुजाण नागरिक उपस्थित करत आहेत. मराठवाड्यात मराठा विरुद्ध ओबीसी असे वातावरण चांगलेच पेटले आहे. ग्रामीण भागात एकमेकांच्या सभांचे बॅनर फाडणे व त्यामधून वाद उद्भवणे असे प्रकार सर्रासपणे सुरू आहेत. ग्रामीण भागात या दोन्ही समाजाचे कार्यकर्ते व नागरिक आपापसात भिडले आहेत. मराठवाड्यात आरक्षणाच्या सभाच नकोत, असा सूर आता यामुळे उमटत आहे.

मराठा आरक्षणावरून ओबीसी नेते तथा मंत्री छगन भुजबळ आणि मनोज जरांगे आमने-सामने आल्याचे पाहायला मिळत आहे. दोन्ही नेत्यांकडून भव्य सभादेखील घेतल्या जात आहेत. ऐन दिवाळीत रात्री दहाच्या नंतर फटाके फोडू नये, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाकडून देण्यात आले होते. पोलीस यंत्रणेने त्या आदेशाचे पालन करत मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यात रात्री दहाच्या नंतर फटाके फोडू दिले नाहीत. असे असताना रात्री दहाच्या नंतर रात्री उशिरापर्यंत आरक्षणाच्या मुद्द्यावरून जाहिर सभा कोणत्या कायद्यात बसणाऱ्या आहेत? असा सवालही यानिमित्ताने पुढे येत आहे. मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्यात छगन भुजबळ व मनोज जरांगे या दोन्ही नेत्यांची एकामागून एक सभा होणार आहेत.

येत्या रविवारी म्हणजेच २६ नोव्हेंबरला छगन भुजबळ यांची हिंगोली येथील रामलीला मैदानावर भव्य सभा आयोजित करण्यात आली आहे, तर दुसरीकडे मनोज जरांगे यांचीदेखील हिंगोली-परभणी रोडवरील दिग्रस कराळे फाट्यावर ११० एकरवर सभा होणार आहे. त्यामुळे या दोन्ही नेत्यांच्या सभेकडे मराठवाड्याचेच नव्हे; तर संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. ओबीसींच्या विविध मागण्यांसाठी २६ नोव्हेंबर रोजी हिंगोली येथील रामलीला मैदानावर ओबीसी एल्गार महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याला राज्यातील ओबीसी नेते हजेरी लावणार असल्याचे ओबीसी जनमोर्चाच्या वतीने सांगण्यात आले.

यावेळी उद्घाटक म्हणून राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांची विशेष उपस्थिती, तर राहणारच आहे. शिवाय अध्यक्षस्थानी प्रकाश शेंडगे राहतील. काही दिवसांपूर्वीच मराठवाड्यातील जालना जिल्ह्यातील अंबड येथे भुजबळ यांची झालेली मोठी सभा संपूर्ण राज्यात गाजली होती. त्या सभेनंतर मराठवाड्यात ओबीसी बांधव चांगलाच पेटून उठला आहे. भुजबळ यांच्या जालना जिल्ह्यातील सभेला उत्तर देण्यासाठी मराठवाड्यातील हिंगोली येथे पुन्हा एकदा आरक्षणाच्या सभेतून रणकंदन माजणार आहे. भुजबळ यांच्या हिंगोली येथील सभेपाठोपाठ मनोज जरांगे यांचीही सभा हिंगोलीत होणार असल्याचे जाहीर केले आहे. मराठवाड्यातील जालना जिल्ह्यातील अंबड येथे छगन भुजबळ यांची खूप मोठी सभा झाली. **क्रमश:**

**- डॉ. अभयकुमार दांडगे**


## शब्दकोडे-२४०

**आडवे शब्द**

१. आडपडदा नसलेले (वर्तन) ४. दोन प्रमुख कौरव ९. कौसल्यापुत्र १०. घरापुढील चारचाकी ११. वाचा १२. टेकू, आश्रय १४. अत्यंत गोड १५. अस्थिर १७. प्रजा १९. दुलई २१. सौंदर्य २३. नशीब लिहिणारी २४. लेखणी २६. संवाद संपल्यावर सुरू होणारा २८. सामन्यातील पराक्रमी ३०. घाबरलेला, गांगरलेला ३१. धमनी ३३. अवघा, सगळा ३४. भीतीने होणारा कंप ३५. भ्रमर ३६. मनाचे ेक लिहिणारे संत ३८. मगज ४०. शेवट ४२. राजा ४४. मनाची घालमोल, तडफड ४५. लाकडी पादत्राणे ४७. रात्र ४९. दरवाजा ५०. घोड्याचे अंग घासणे ५१. तेजस्वी, राजबिंडा ५२. चौऱ्याऐंशी लक्ष फ ेऱ्यांनंतर प्राप्त होणारा देह ५४. मला ५५. सुवर्णचंपक ५७. एका बाजूला झुकणे ५८. चर्चा ६०. घाण ६१. पारा लावलेली काच ६२. घुंगरांचा आवाज ६३. पुरुष ६४. आणि ६५. शरीर ६६. आदानची दुसरी बाजू ६७. घाई ७०. पाठीतील हाडांच्या माळेतील एक ७२. थोडे ७४. बहराचे वय ७५. रूंद पान ७६. बारीक मण्यांची माळ ७७. मोबदला

**उभे शब्द**

१. मर्यादा, सीमा २. रम्य ३. कॅप्टन (मराठी) ४. भोपळ्याचा पांढरा प्रकार ५. तगडा, धट्टाकट्टा ६. दु:सह अनुभव, वेदना ७. वाकडा नसलेला ८. नवा जोम १०. काळ्या रंगाची १३. चंद्र १६. निस्तेज १८. वृक्ष, झाड २०. शिर्डीचे संत २२. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना २३. मंत्रीमंडळ २४. युक्ती २५. दुसऱ्याच्या मनातील विचार ओळखणारा २६. पातळ खांब २७. वचक, भीती २९. लढताना आलेला मृत्यू ३२. लवंगी फटाक्याची माळ ३७. टोळीचा प्रमुख ३९. उन्हाळी पांढरे सुगंधी फूल ४०. राजा कर्णाचे एक नाव ४१. लांब अंतरावर ४३. पुन्हा ४४. फुलणे ४५. अफूचे बी ४६. विल्हेवाट ४८. या दोन टोकांमधील प्रवास म्हणजे आयुष्य ५२. व्यापारातील फायदा ५३. तोटा होईल असे ५४. मनातल्या मनात, मनापासून ५६. नर्तकीचे पैंजण ५८. प्रेमळपणा, आपलेपणा ५९. अंगावरील बारीक केस ६१अ. गुंग, रममाण ६२. अगदी कमी मूल्याचे नाणे ६३. नमस्कार ६८. जमिनीवर घरटे करणारा पक्षी ६९. अजून थोडे ७१. फणसाचा एक प्रकार ७३. स्वच्छंद, मुक्त



## शब्दकोडे-२३९ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.दारुबंदी ५.आपपरभाव ११.धरणीकंप १३.टारगट १४.कपार १६.लाडिक १७.ठसठशीत १८.कासरा २०.जुने २२.पदरमोड २३.आटपाट नगर २५.ओम २६.तयारी २७.तारकस २८अ. लाहो २९.बोरू ३०.जगरहाटी ३२.समोर ३३.जवळजवळ ३५.प्रभाकर ३७.नाव ३८.डर ३९.पोकळ ४०.दस ४१.चुका ४२.विमानतळ ४५.हेवा ४६.मका ४८.सरा ५०.नगरपालिका ५२.समरसता ५४.हमखास ५६.फट ५७.वरात ५९.खुदा ६०.तोरा ६१.डफ ६२.कशिदा ६३.सरदार ६६.रीत ६८.बाधक ६९.तलाव ७०.हजरत ७१.सार ७४.जीत ७५.नवरीनवरा ७६.रविवार

**उभे उत्तर**

१.दाखला देणे २.बंधक ३.दीर ४.आकंठ ६.पटाशी ७.परतपरत ८.रग ९.भाटकार १०.सोपा १२.पसरट १४.कराड १५.रजतमहोत्सव१९.समोरसमोर २०.जुआरी २१.नेट २४.पानगळ २५.ओला २६.तरूवर २८.कसकस २९.बोजड ३०.जव ३१.हाटक ३४.जनमानस ३६.भादवा ३७.नाका ३९.पोळपाट ४१.चुकार ४३.नग ४४.तरफदारी ४६.ममता ४७.त्राता ४८.सहजासहजी ४९.राम ५१.कावराबावरा ५३.सदाशिव ५५.खासदार ५८.तडकसार ६२.कलाकार ६४.रजत ६५.रतन ६७.तहान ७२.रवि ७३.कोटी

## सोभाव (सुत्र २५)

## सोभाव बद्दल आपलं अज्ञान.



डॉ.रा.प्र.पारनेरकर

मानूस दहा लोकेसशे रपव एकेकटे बोलस आनी दहा लोके ईकठ्ठा जमात ते त्यासनाशे बोलान या दोन्ही बी गोष्टी समा बोलनाऱ्या वृत्ती या म्हना की वागामा म्हना हाऊ फरक पडसच. तशाच त्या दहा लोकेसपैकी परतेकजन एकेकटा भेटना आनी बोलना तधय त्या न्यारा न्यारा वृत्ती ना बोलत -हातस .कधय कधय आसं बी घडस की परतेकनी सांगेल ईचार एकच व्हतीन.त्यासनी परतेकनी वृत्ती भिन्न -हाईन त्या कारनं आपल्या व्यक्तीमत्त्वना ठसा जसा त्यास्नावर बठेल -हाईन तशा त्यास्नावर व्हनारा परिनाम म्हन्जे परतेकनी वृत्ती -हास.ह्या दहा जधय ईकठ्ठा व्हतस तधय दहा लोकेसशे न्यार न्यार -हानरं व्यक्तिमत्त्व दशदा न -हाता एकविध व्ह ईसनी एक न्यायचं व्यक्तीमत्व निरमान व्हस. एकेकटे पनाम्हा भेटताना बहुतेक आपलं ठरेल आस वरचढ व्यक्तीमत्व या ईकठ्ठा व्हयेल व्यक्तीमत्वनापुढे हलकं व्हस आनी या काननी करता दहासनी हरेकना सोतंत्र असं आपलं देयेल -हास. आपल्या व्यक्तीमत्त्वना ठसा पडामुये जी शुल्लक किंमत -हास ती कमी व्हस. तसच आपन हरेकशी बोलताना जी खास गुंजाईश ठेयेल -हास ती आपोआप निंघी जास.दहा लोकेसमा आपलं बोलनं गनज रास्त आनी वाजवी किंमतवर येस. तव्हय साधारनपने मानूस एकेकटपनी दोन्ही शी बरंच खोटं बोलतस जितलं दहा लोकेसनासमोर बोलत नैत. अशी साधारन मानूससोभावनी ठेवनं दिखी येस.या मानूस सोभावना जो नियमसना ज्ञान नसामुये अभावितपने मानूस फसस.त्याले मुद्दामव्हईसनी जानी बुजीनसन कोनी फसआडत नै.आनी हाऊ बी कोनले फसआडत नै.परंतु या परिस्थितीम्हाईन दुसरी जी एक फसवी अशी गंमत निरमान व्हस. ती हाई की कोनीच कोना शबदवर ईसवास भरवसा ठेवत नै.म्हनीसनी समोरना आपलाशी लबाड खोटं बोलानी शक्यता शे. हाई जानीवनामुये हाऊ जास्त खोटं बोलत.आनी सामनेवालाबी हाऊच हेतू मुये याले बरं वाटावं म्हनीसन गनज खोटी किंमत दिसली बोलस.दहा लोके ईकठ्ठा इसनी सत्याकडे वयनात ते सत्य ना जास्त जोगे येतसे. पन जर असत्यानामांगे गयात ते मातर कितला अमर्याद खोटं करतीन ह्यानी सिमाच -हावाव नै.इतलासा कारनामुये मानवी जीवन हाई सुतसारख सरय न व्हता भलतच गुंतागुंत व्हत येयेल शे.भरवसा ठेवनबी पाप आनी न ठेवनबी पापच.असा हाऊ सध्या मानवसंस्कृतीना दंडक शे.अशा परिस्थिती नामुये भरवसा,दखआडस हाई खरं ते धीर देनारा -हास.पन तोच आज भितीना डरपोक ईषय व्हयेल शे. हाऊ काल मानूसले आपला खाजगी सोभाव निरमान करेल शे.

**– प्रा.भगवान पाटील. अध्यक्ष, अहिरानी साहित्य परिषद धुळे**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

## निधन वार्ता

### चंद्रभागाबाई शिरसाट



**नाशिक ।** येथील ज्ञान साधना शिक्षण प्रसारक संस्थेचे संचालक व गंगापूर येथील दे.ना.पाटील माध्यमिक विद्यालय व ज्यु. कॉलेजचे क्रीडा शिक्षक हेमंत पाटील आणि ॲड. विनय पाटील यांच्या मातोश्री चंद्रभागाबाई पोपटराव शिरसाट (पाटील) (वय ६९ ) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, दिर, सुना, जावई, पुतणे, नातवंडे असा मोठा परिवार आहे. एनडीएसटी शिक्षक सोसायटीचे माजी कार्यवाह भाऊसाहेब शिरसाट (छोटू) यांच्या त्या चुलती होत.

..................................

### शांतीलाल गोसावी



**धुळे ।** तालुक्यातील घाणेगाव येथील रहिवासी शांतीलाल बाबुलाल गोसावी (वय ६०) यांचे दि.२३ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ८.३० वाजता अल्पशः आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, दोन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. ते 'दै.लक्ष महाराष्ट्र'चे डीटीपी ऑपरेटर भटू बावा यांचे मावसा होतं.

# मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांचा बालस्नेही पुरस्काराने सन्मान

## बालकल्याणासाठी राबवण्यात आलेल्या उपक्रमांची दखल

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांना बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा सुशिबेन शाह यांच्या हस्ते २०२२-२३ या राज्यस्तरीय बालस्नेही पुरस्काराने सन्मान करण्यात आला. दि. २२ नोव्हेंबर रोजी मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्र राज्यात बालकांचा सर्वांगीण विकास, बाल हक्क संरक्षण त्यांची सुरक्षा, कुपोषण,आरोग्य या विषयावर काम करणाऱ्या यंत्रणा व यंत्रणेतील अधिकारी यांना त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामाबद्दल बाल हक्क संरक्षण आयोग, महिला व बाल विकास विभाग, सी.सी.डी.टी. संस्था, युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने बालस्नेही पुरस्कार हा देण्यात येतो.

नाशिक जिल्हा परिषदेच्या वतीने महिला व बाल विकास विभागासह शिक्षण विभाग, आरोग्य विभाग यांच्या समन्वयाने विविध नावीन्यपूर्ण



उपक्रम राबवण्यात येत आहेत. नाशिक जिल्ह्याच्या ग्रामीण भागात कुपोषण निर्मूलनासाठी जिल्हा परिषदेचा महिला व बालविकास विभाग, आरोग्य विभाग यांच्या समन्वयातुन आयआयटी मुंबई या संस्थेच्या मदतीने स्तनपान महत्व व पुरक पोषण आहार हा कार्यक्रम राबवण्यात येत आहे. सॅम, मॅम कुपोषण व्यवस्थापन अंतर्गत कुपोषित बालक व पालक यांचा किलबिल मेळावा, कुपोषित बालकांना अतिरिक्त पोषण आहार किट वाटप, बाला अंगणवाडी अश्या विविध उपक्रमामुळे जिल्ह्यातील कुपोषणाच्या समस्येवर मात करण्याचा प्रयत्न हा जिल्हा परिषदेच्या वतीने करण्यात येत आहे.

शिक्षण विभागाच्या वतीने १२८ मॉडेल स्कूल या तयार करण्यात येत असून जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना भविष्यवेधी शिक्षण देण्यात येत आहे. नाशिक जिल्ह्यातील सर्व शाळांतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात येऊन विद्यार्थ्यांचे हेल्थ कार्ड तयार करण्यात येत आहे. त्याचबरोबर कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील विद्यार्थीनीना कराटे प्रशिक्षण देण्यात येत आहे. गत वर्षापासून जिल्हा परिषदेच्या वतीने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी सुपर ५० या उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नीट, जेईई, जेईई ॲडव्हान्स, सीइटी या परीक्षांसाठी निवासी स्वरूपाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. उमेद अंतर्गत राखी महोत्सव व महिला बचत गट सक्षमीकरण,महिलांसाठी महिला स्नेही ग्रामपंचायत असे उपक्रम राबविण्यात येत आहे. आरोग्य विभागाअंतर्गत आभा कार्ड, गोल्डन कार्ड, महिला व बालकांची आरोग्य तपासणी, समाज कल्याण विभागा अंतर्गत दिव्यांग मुलांची तपासणी व पुनर्वसन, पशुसंवर्धन विभागा मार्फत कुपोषित बालकांच्या पालकांना कोंबडी वाटप असे उपक्रम सर्व जिल्हा परिषद विभागामध्ये समन्वय साधून महिला व बालकांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

हा पुरस्कार मिळाल्याबाबत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी महिला व बालविकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रताप पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे, शिक्षणाधिकारी डॉ.नितीन बच्छाव यांच्यासह नाविन्यपूर्ण उपक्रमांमध्ये सहभागी सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले. अशी माहिती जिल्हा कार्यक्रम अधिकारी डॉ.प्रताप पाटील यांनी दिली.

# कांदा अनुदासाठी सरकारकडे पाठपुरावा करा

### लासलगाव बाजार समितीला कांदा संघटनेचे पत्र

**लासलगाव । वार्ताहर**

राहीलेले कांदा अनुदान एकरकमी मिळवण्यासाठी बाजार समित्यांनीही राज्य सरकारकडे पाठपुरावा करावा अशी मागणी महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटने कडून करण्यात आली आहे.

१ फेब्रुवारी ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना साडेतीनशे रुपयांचे अनुदान राज्य सरकारकडून जाहीर करण्यात आले होते यापैकी अनेक शेतकऱ्यांना एक किंवा दोन हप्ता तर अनेक शेतकऱ्यांना एकही हप्ता कांदा अनुदान खात्यावर जमा झालेले नाही.लासलगाव बाजार समितीमध्ये विक्री करण्यासाठी घेऊन आलेल्या शेतकऱ्यांना राहिलेले कांदा अनुदान एकरकमी मिळावे यासाठी बाजार समिती पदाधिकारी,अधिकारी यांनी थेट मुंबईत जाऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन सरकारने कांदा उत्पादकांचे राहीलेले सर्व कांदा अनुदान एकरकमी तत्काळ द्यावे अशी मागणी करावी यासाठी लेखी पत्राद्वारे महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे यांनी मागणी केली आहे केली आहे.लासलगाव बाजार समितीचे सचिव नरेंद्र वाढवणे यांना तसे पत्र देण्यात आले आहे. राज्यातील सर्व बाजार समित्यांनीही राज्य सरकारकडे शेतकऱ्यांचे राहीलेले कांदा एकरकमी मिळावे याकरिता पाठपुरावा करावा यासाठी त्या बाजार समित्यांना पत्र दिले जाणार आहे अशी माहिती कांदा संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळे यांनी दिली मुंबई वाशी मार्केटमध्ये व परराज्यात विक्री केलेल्या शेतकऱ्यांनाही या कांदा अनुदान योजनेत समावेश करावा यासाठीही कांदा संघटनेकडून राज्य सरकारकडे पाठपुरावा सुरू आहे.


नि.६

**जाहीर नोटीस**

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश क.स्तर सो। यांचे कोर्टात**

**दि. कि. अर्ज. नं. - १३२५/२०२३**

राजेंद्र अशोक पगारे वगैरे .....**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** ...**जाबदेणार**

कै. बणुबाई बारकु पाटील (पगारे) रा. विंचुर ता.जि धुळे, मृत्यु दि. २१/१०/२००८ ...**मयत**

ज्याअर्थी अर्जदारांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट क्र. ७. सो. यांचे कडे दि.०६/११/२०२३ रोजी अर्जदार यांनी दि. की. अ. क्र. १३२५/२०२३ चा अर्ज कै. बणुबाई बारकु पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना मयताचे शासकीय व निमशासकीय कामासाठी मे. न्यायालातुन अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखल मिळणे कामी सदर अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करीता पुढील चौकशी दि. २९/१२/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हीतचिंतक, वारस वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, या बाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट क्र. ७. सो. धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी. त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित तारखेपर्यत कोणचीही काहीही हरकत आली नाही. तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्या येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक : २०/११/२०२३ आदेशावरून

**कामगिरी कारकून दिवाणी न्यायालय व स्तर, धुळे** (शिक्का) **अधिक्षक दिवाणी न्यायालय व स्तर, धुळे**


# दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनीअर्स लोकल सेन्टरच्या पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रीय स्तरावर आपला ठसा उमटवला

**नाशिक । प्रतिनिधी**

दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनीअर्स (इंडिया) महाराष्ट्र स्टेट सेन्टर राज्य शाखेच्या मॅनेजिन कमिटी २०२३ - २०२५ या कार्यकाळासाठी साठी झालेल्या निवडणुकांमध्ये दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनीअर्स (इंडिया) नाशिक लोकल सेन्टरच्या पदाधिकाऱ्यांनी विजय मिळवला. राज्य शाखेच्या कमिटीमध्ये सिव्हिल शाखेतून नरेंद्र बिरार आणि महेंद्र शिरसाट, एरोस्पेस शाखेतून सुमित खिंवसरा, मेकॅनिकल शाखेतून समीर कोठारी आणि संजय देशपांडे, कॉम्पुटर शाखेतून महेश संघवी प्रतिनिधित्व करत आहेत.

तसेच दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनीअर्स (इंडिया) कोलकाता (हेड ऑफिस) राष्ट्रीय शाखेचे उपाध्यक्ष महेंद्र कोठारी, नाशिक लोकल सेन्टरचे अध्यक्ष महावीर चोपडा, कौन्सिल मेंबर मनीष कोठारी, कौन्सिल मेंबर संतोष मुथा हे देखील राष्ट्रीय शाखेच्या (कोलकाता) आणि राज्य शाखेच्या (महाराष्ट्र स्टेट सेन्टर) च्या मॅनेजिन कमिटीत आपले प्रतिनिधित्व करत आहे.

दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनीअर्स (इंडिया) नाशिक लोकल सेन्टर स्थानिक शाखेच्या मॅनेजिन कमिटीमध्ये अध्यक्ष महावीर चोपडा, मानद सचिव विपुल मेहता, सहसचिव दिपक पंजाबी, गौरव धारकर, अंजली आडे, वेदांत राठी, दीपक पाटील, धनंजय ओढेकर, संतोष संचेती, वैभव नागसेथींया आपले प्रतिनिधित्व करत आहे. नाशिक लोकल सेन्टरच्या सभासदांनी महाराष्ट्र स्टेट सेन्टरच्या मॅनेजिन कमिटीचे अभिनंदन केले आहे. तसेच उद्योग व अभियांत्रिकी क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# स्वामी नारायणनगरला आज सामूहिक तुलसीविवाह: कृष्णा महाराज कमानकर यांचे प्रवचन

**नाशिक । प्रतिनिधी**

नवीन आडगाव नाका येथील स्वामीनारायण युवक मित्रमंडळातर्फे शुक्र वार दि. २४ सायंकाळी ६.३० वाजता स्वामी नारायणनगरमधील चंद्रवेल अपार्टमेंट चौकात सामुदायिक तुलसीविवाह सोहळा आयोजित करण्यात आला आहे.



याप्रसंगी निफाड तालुक्यातील भेंडाळी येथील युवा कीर्तनकार कृष्णा महाराज कमानकर यांचे प्रवचन होईल. संत साहित्याचे अभ्यासक डॉ. तुळशीराम महाराज गुट्टे, त्र्यंबकेश्वर येथील स्वामी श्रीकंठानंद , श्री पंचमुखी हनुमान मंदिराचे महंत भक्तिचरणदास महाराज, प्रजापिता ब्रह्मकुमारी पुष्पादीदी, श्री एकमुखी दत्तमंदिराचे मुख्य पुजारी मयूरेश बर्वे, तपोवन येथील उमेश महाराज, साहित्यिक सावळीराम तिदमे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सोहळ्यात राजकीय, सामाजिक, शैक्षणिकसह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. मंडळाच्या वतीने १९ वर्षांपासून या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत असून, आजपर्यंत विविध क्षेत्रांतील मान्यवर सहभागी झाले आहेत.

कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक युवक मित्रमंडळाचे अध्यक्ष सोमनाथ बोडके, गिरीश आहेर, बाळासाहेब भवर, योगेश पाटणकर, सागर भगत, सचिन शिरुडे, ॲड. रवींद्र ताजणे, महेश कापडे, भावेश भगत, जितेंद्र महाजन, विशाल पवार,जयेश काठे,देवदत्त बोराडे,प्रवीण बोरस्ते आदींनी केले आहे.

# डॉ. देवगांवकर यांचे किडनीविकारावर व्याख्यान

**नाशिक । प्रतिनिधी**

महारूद्र हनुमान मंदिर व श्री संतकृपा ज्येष्ठ नागरिक हॉल यांचा संयुक्त नुतनीकरण उद्घाटन सोहळा रविवार दि. २६ रोजी सकाळी १० वाजता विजयनगर, आडगाव नाका, पंचवटी नाशिक येथे करण्यात आला आहे. अशी माहिती अध्यक्ष वसंतराव पुंड, छबुलाल खैरनार, सुधाकर देवरे, जगन्नाथ सुर्यवंशी, जितेंद्र येवले यांनी दिली.

या भव्य दिव्य कार्यक्रमासाठी नाशिकचे ख्यातनाम किडनीविकार तज्ञ डॉ.पार्थ देवगांवकर यांचे किडनीविकार जनजागृतीपर मार्गदर्शनाचे आयोजन केले आहे. यासाठी आ. राहुल ढिकले, धनंजय माने, रूची कुंभारकर, प्रियंका माने, अंबादास खैरे, मच्छिंद्र सानप, शंतनु शिंदे आदी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. जास्तीत-जास्त नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संतकृपा ज्येष्ठ नागरिक संघातर्फे करण्यात आले आहे.

# वारकरी संघटन ही काळाची गरज : आणणासाहेब महाराज आहेर

**नाशिक । प्रतिनिधी**



पक्षी थव्याने पशु कळपाने,छोटीसी मुंगी सुध्दा एकत्रच व एका माग एक चालतात. मधमाश्या सुध्दा पोळावर एकत्रच बसलेल्या असतात.त्यामुळे मधाचे पोळाला सहसा कोणी काढण्याची हिम्मत करत नाही.एक काठी एकटी असेल तर वाकते,मोडते पण काठीची मोळी बांधली तर ती मोडता येत नाही. वारकरी संप्रदायाने सुध्दा आज एकत्र येऊन एकसंघ होऊन संघटन होण काळाची गरज आहे,असे विचार प्रदेश संपर्कप्रमुख आण्णासाहेब महाराज आहेर हिसवळकर यांनी समारोपाचे भाषणात पेठ येथे व्यक्त केले.ते अखिल भाविक वारकरी मंडळ शाखा उद्घाटन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते

वारकरी फलकाचे अनावरण श्री मंदाकीनी महाराज यांचे शिष्य प.पू.श्री विष्णु महाराज यांचे हस्ते संपन्न झाले.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रदेश संपर्कप्रमुख आण्णासाहेब महाराज आहेर हिसवळकर होते. व्यासपीठावर जिल्हाध्यक्ष अशोक महाराज गांगुर्डे सोग्रसकर, वारकरी महामंडळ पेठ तालुकाध्यक्ष पंढरीनाथ महाराज वालवणे गुरुजी, वारकरी महामंडळ जिल्हा संपर्कप्रमुख भिमाशंकर महाराज राऊत, संघटक रामदास सिरसाठ विश्व वारकरी सेना प्रदेश संपर्कप्रमुख गणेश रहाणे, तालुका अध्यक्ष वालझाडे महाराज करंजाळी, लक्ष्मण महाराज टोपले, प्रसिद्ध किर्तनकार भागवत महाराज देशमुख,संतोष म.देशमुख, कार्यक्रम संयोजक हिरामण महाराज चौधरी बाळासाहेब महाराज चौधरी,अ.भा.वारकरी मंडळाचे सहसचिव साहेबराव महाराज अनवट, दिंडोरी तालुका अध्यक्ष आबाजी महाराज गाडे,पेठ तालुका अध्यक्ष रमेश महाराज भोये सर, संघटक बंडोबा महाराज जालखेड, महिला समिती पेठ तालुका अध्यक्ष अश्विनीताई चौधरी, महिला वारकरी समिती नाशिक जिल्हाध्यक्ष सुमनताई बाळासाहेब शिंदे जिल्हा उपाध्यक्ष बबिताताई साहेबराव अनवट,सचिव शालिनीताई पाटील, नाशिक शहर अध्यक्षा सुनिता ताई गंभिरे, सातपूर महिला समिती अध्यक्षा सुमनताई पाटील आदी व्यासपीठावर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते पदाधिकारी निवड घोषित करुन त्यांचा पेठ तालुका अध्यक्ष यांचे वतीने यथोचित सत्कारही करण्यात आला.यावेळी मान्यवरांची ही भाषणे झाली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन तालुका अध्यक्ष रमेश महाराज भोये सर व गोवर्धन महाराज चौधरी यांनी केले.शेवटी फलहार देऊन कार्यक्रमाची पसायदानाने सांगता झाली.


**प्रोसेस जमा** **ॲड.श्रीमती. रुपाली एल. पवार, साक्री**
नि.६

**जाहीर नोटीस**

**साक्री येथील मे. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज क्र. ३७७/२०२३**

श्री. प्रकाश भास्कर शिंपी व इतर, उ.व.६०, धंदा-शेती, राहणार-बलवंड, ता.जि.नंदुरबार .....**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** ...**सामनेवाला**

मयत - कै. भास्कर गोविंद शिंपी (मृत्यू दि.-१८/०६/२००५) ...**मयत**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह दिवाणी न्यायालय, क. स्तर, येथे दिनांक ०६/११/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. भास्कर गोविंद शिंपी याचे दिनांक १८/०६/२००५ रोजी निधन झाले आहे, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. श्री. प्रकाश भास्कर शिंपी,
२. श्री. दिलीप भास्कर शिंपी,
३. श्री. रमेश भास्कर शिंपी,
४. श्रीमती. मिराबाई रामदास बोरसे,
५. सौ. हिराबाई प्रल्हाद शिंपी,
६. सौ. सुलोजनाबाई शांतीलाल शिंपी,
७. सौ. मिनाबाई सुनिल पवार,

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय, निमशासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, साक्री कोर्ट क्र. २ यांचे न्यायालयात दिनांक ०५/०१/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित अरण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ-साक्री,
दिनांक - २०/११/२०२३ आदेशावरून

**क. लिपीक कामगिरी कारकुन, साक्री** (शिक्का) **अधिक्षक सह दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री**



**प्रोसेस जमा** **ॲड.श्री. विकास एस. माळी, साक्री**
नि.६

**जाहीर नोटीस**

**साक्री येथील मे. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज क्र. ३८३/२०२३**

श्रीमती. सुमनबाई लोटन गवळे व इतर, उ.व.६५, धंदा-घरकाम, राहणार-खुडाणे, ता. साक्री, जि.धुळे .....**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** ...**सामनेवाला**

मयत - कै. लोटन रघुनाथ गवळे -(मृत्यू दि. - २०/०३/२०१३) ...**मयत**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, येथे दिनांक ०८/११/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. लोटन रघुनाथ गवळे याचे दिनांक २०/०३/२०१३ रोजी निधन झाले आहे, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे

खालील प्रमाणे वारस आहेत.

१. श्रीमती. सुमनबाई लोटन गवळे,
२. श्री. जितेंद्र लोटन गवळे,
३. श्रीमती. अनिता सुदाम गवळे,
४. भुषण सुदाम गवळे,
५. सौ. हर्षदा सुदाम गवळे,
६. सौ. हिराबाई आनंदा माळी,

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय, निमशासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साकी येथील मे. सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, साक्री कोर्ट क्र. २ यांचे न्यायालयात दिनांक ०८/०१/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित अरण्यात येईल. सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ -साक्री
दिनांक -२०/११/२०२३ आदेशावरून

**क. लिपीक कामगिरी कारकुन, साक्री** (शिक्का) **अधिक्षक सह दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री**

# शिरपूर कार्तिक स्वामींचे मंदिर दोन दिवस खुले राहणार!

### वर्षातून एकदाच उघडते मंदिर

**शिरपूर । प्रतिनिधी**

शहरातील पाताळेश्र्वर मंदिर व तापी नदीच्या काठावरील कुरखळी येथे प्राचीन काळातील कार्तिक स्वामी मंदिर आहे. पौर्णिमा व कृत्तिका नक्षत्र असल्यामुळे यावर्षी कार्तिक स्वामींचे मंदिर दर्शनासाठी खुले केले जाणार आहे. ही दोन्ही मंदिरे वर्षातून फक्त एकदाच महिलांच्या दर्शनाकरिता खुली केली जातात. दरम्यान, २६ रोजी दुपारी ३.५४ वाजेपासून तर २७ रोजी दुपारी १.३५ वाजेपर्यंत मंदिर दर्शनासाठी खुले राहणार आहे.

तापी नदीच्या काठावर निसर्गरम्य परिसरात असलेल्या कार्तिक स्वामी व कुरकुटेश्र्वर मुनी ही दोन प्राचीन मंदिरे आहेत. श्रीराम, लक्ष्मण व सीता हे वनवासाला निघाले असताना या ठिकाणी असलेल्या कुरकुटेश्र्वर मुनींच्या आश्रमात थांबले. तापी नदी पार करण्यापूर्वी प्रत्यक्ष श्रीराम



यांनी त्यांच्या हाताने या ठिकाणी शिवलिंगाची प्रतिष्ठापना केल्याचे सांगितले जाते. या मंदिराच्या बाजूलाच कार्तिक स्वामींचे मंदिर आहे. मंदिरात दोन ज्योतिर्लिंगाच्या मूर्ती असून, त्यांना पितळी पत्र्याचे आवरण आहे. याच ठिकाणी प्रेमानंद महाराजांनी जिवंत समाधी घेतलेली आहे. वर्षातून एकदाच महिलांना या दिवशी दर्शनासाठी मंदिर खुले केले जाते. धुळे जिल्ह्यात याच ठिकाणी हे मंदिर असल्यामुळे या दोन्ही मंदिरांत मोठी गर्दी होते. पाताळेश्र्वर मंदिर : सुमारे अडीचशे-तीनशे वर्षांपूर्वी सातपुड्याच्या कुशीत वसलेले एक छोटेसे गाव म्हणजे शिरपूर. इंदूरच्या होळकरांचे राज्य तापीच्या काठापर्यंत पसरलेले होते. त्यामुळे शिरपूरला महत्त्व होते.

श्रीपाताळेश्र्वर संस्थानच्या जन्माची कथा मोठी विलक्षण आहे. असे म्हणतात की, त्या रात्री अहिल्यादेवींना दृष्टांत झाला. त्यांना शिवदर्शन झाले. आपले ते सुंदर स्वप्न त्यांनी सत्यसृष्टीत उतरविण्याचा निश्र्चय केला. त्यावेळी गावाच्या शेवटी टेकड्यांनी वेढलेली एक जागा त्यांनी निवडली. ती म्हणजे भवानी टेकडीजवळील आजचे मंदिर स्थित असलेले ठिकाण. मंदिर बांधण्यासाठी खोदकामाला सुरुवात झाली आणि लगेच दुसऱ्या दिवशी खोदकामाच्या ठिकाणी स्वयंभू शिवलिंगाची मूर्ती सापडली. तेव्हापासून हे मंदिर 'पाताळेश्र्वर' या नावाने ओळखले जाऊ लागले. या मंदिरात प्राचीन काळातील संगमरवरी दगडाची सहामुखी कार्तिकी स्वामींची मूर्ती आहे. कार्तिकी स्वामींचे महादेव मंदिराजवळ संस्थानने एक स्वतंत्र लहान मंदिर बांधले आहे. वर्षभर हे मंदिर बंद असते. फक्त कार्तिकीलाच हे मंदिर उघडले जाते.

श्री स्वामी समर्थ केंद्र शहरातील सरस्वती कॉलनीतील स्वामी समर्थ सेवा केंद्रात कार्तिकी उत्सव साजरा केला जात आहे. या ठिकाणी फक्त कार्तिकी स्वामी प्रतिमेचे पूजन व दर्शनाचा लाभ घेता येणार आहे. कार्तिक स्वामींचे मंदिर वर्षातून एकदाच उघडत असल्यामुळे भाविकांना या दिवशी दर्शनाचा लाभ दिवसभर घेता येणार आहे. दोन्ही मंदिरांत मोठी गर्दी होते.

## न्यूज कॉलम

### नरभक्षक बिबट्या पिंजऱ्यात कैद

**म्हसदी ।** देऊर खुर्द (ता. धुळे) शिवारात मेंढपाळाच्या चिमुरडीवर हल्ला करणारा आणि तीन दिवसांपासून वन विभागाला हुलकावणी देणारा नरभक्षक बिबट्या अखेर पिंजऱ्यात कैद झाला. ट्रॅप कॅमेऱ्यात बिबट्या पिंजऱ्यात कैद झाल्याचे दिसताच रात्री गस्तीवर असलेल्या वनकर्मचाऱ्यांनी निःश्र्वास सोडला. वन विभागाच्या सर्च मिशनमुळे देऊर खुर्द परिसरातील शेतकरी तात्पुरते भयमुक्त झाले असले, तरी भटकंती करणाऱ्या मेंढपाळांच्या संरक्षणाचा प्रश्न मात्र 'जैसे थे' आहे.

### 'रब्बी हंगामासाठी ३१ पर्यंत अर्ज द्यावेत'

**शिरपूर ।** येथील मध्यम प्रकल्प शाखेच्या कार्यकारी अभियंत्यांच्या कार्यक्षेत्रातील पांझरा, मालनगाव, जामखेली, बुराई, कनोली, सोनवद, अक्कलपाडा, वाडी- शेवाडी, अनेर, करवंद, अमरावती, सुलवाडे बॅरेज मध्यम प्रकल्प तसेच अधिसूचित लाभक्षेत्रातील पाण्याचा फायदा घेणाऱ्या बागायतदारांनी रब्बी हंगामासाठी ३१ डिसेंबरपर्यंत पाणी अर्ज सादर करावेत.




# भाजपा जिल्हा सहप्रसिध्दी प्रमुखपदी : मोतीलाल पोतदार

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

येथील भाजपाचे सक्रीय कार्यकर्ते मोतीलाल भिवसन पोतदार रा. पिंपळनेर ता. साक्री जि. धुळे यांची नुकतीच धुळे ग्रामिण भारतीय जनता पार्टी जिल्हा सहप्रसिध्दी प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजपा जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी यांनी नुकतेच मोतीलाल पोतदार यांना पिंपळनेर येथे नियुक्ती पत्र देवुन सत्कार केला. ही नियुक्ती, खा. हिना गावित , डॉ सुभाष भामरे, आदिवासी विकास मंत्री मा. विजयकुमार गावित याच्या आदेशा व यावेळी भाजपा किसान मोर्चा प्रदेश चिटणीस ॲड. संभाजीराव पगारे, धुळे भाजपा जिल्हा सरचिटणीस अरुण धोबी, जिल्हा उपाध्यक्ष प्रदीप कोठावदे, हर्षवर्धन दहिते ,साक्री विधानसभा निवडणूक प्रमुख मोहन सुर्यवंशी, साक्री तालुकाध्यक्ष संजय अहिरराव, पिंपळनेर मंडळ अध्यक्ष विक्की कोकणी, पिंपळनेर अध्यक्ष डॉ. राजेंद्र पगारे, महिला मोर्चा माजी जिल्हाध्यक्षा प्रा. सौ. सविता पगारे, भाजपा जिल्हा चिटणीस प्रमोद गांगुर्डे, सोशल मिडीया संयोजक प्रतिक कोतकर, पिंपळनेर मंडळ सरचिटणीस चंद्रशेखर बाविस्कर, युवा मोर्चा पिपळनेर मडलध्यक्ष पंकज भावसार,सुरेश पुराणिक, प्रविण देसले ,अनिल मुसळे,प्रकाश अहिरराव संजय भिलाणे हिरालाल कोठावदे,आबाजाधव ,शाम दुसाणे दिपक गागुर्ड,यांच्यासह आदि उपस्थित होते. भाजपा जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी यांनी मोतीलाल पोतदार यांना दिलेल्या नियुक्ती पत्रात म्हटले आहे की, आपले पत्रकारीता क्षेत्रामध्ये चांगले काम आहे. गेल्यावेळेस हि आपण पक्षाचे प्रसिध्दीचे व चिटणिस काम पाहिले आहे. त्याची दखल घेवून आपली ही नियुक्ती करण्यात येत आहे. आपल्या पत्रकारीतेच्या, सामाजिक व संघटनात्मक अनुभवाचा उपयोग पक्षवाढीसाठी निश्र्चितपणे होईल. आपण ही जबाबदारी सर्वांना सोबत घेऊन यशस्वीरित्या पार पाडाल असे म्हटले आहे.

# मुकेश आर. पटेल निवासी सीबीएसई स्कूलच्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड



**शिरपूर । प्रतिनिधी**

श्री विलेपार्ले केळवणी मंडळ मुंबई संचलित तांडे ता. शिरपूर येथील मुकेश आर. पटेल निवासी सीबीएसई स्कूलच्या विद्यार्थ्यांनी भंडारा येथे झालेल्या सीबीएसई स्कूल गेम्स साऊथ झोन-२ बॉक्सिंग स्पर्धेत तीन रौप्य व तीन कांस्य अशी एकूण सहा पदके मिळवली. निकुंज कीर्ती शहा, समृद्धी सचिन चव्हाण व वेदिका विनोद चौधरी या तीन विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

साऊथ झोन-२ मधील महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा या राज्यांतील सीबीएसई शाळांमधील २२० विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. या स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलांच्या गटात निकुंज कीर्ती शहा याने रौप्य पदक, तरण चेतन पाटील याने कांस्यपदक मिळवले. १७ वर्षांखालील मुलींच्या गटात समृद्धी सचिन चव्हाण हिने रौप्य पदक, स्नेहल योगेश पवार हिने कांस्यपदक मिळवले. १९ वर्षांखालील मुलांच्या गटात रोहित सुनीलभाई पाटील याने कांस्यपदक मिळवले तर १९ वर्षांखालील मुलींच्या गटात वेदिका विनोद चौधरी हिने रौप्य पदक मिळवले. राज आत्माराम पाटील, वेदांत लक्ष्मीकांत स्वामी, जिगीषा राजू राठोड, भाविका अजय माळी, जिज्ञासा सुनील कोष्टी हे विद्यार्थी स्पर्धेत सहभागी झाले होते. सर्व खेळाडूंना बॉक्सिंग प्रशिक्षक धीरज पाटील व नेहा कासार यांचे मार्गदर्शन लाभले. एस.व्ही. के.एम. संस्थेचे अध्यक्ष आमदार अमरिशभाई पटेल, सह-अध्यक्ष भूपेशभाई पटेल, व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, स्कूल डायरेक्टर गिरीजा मोहन, स्पोर्ट्स डायरेक्टर किरण अंचन, प्राचार्य डॉ.जॉन लॉरेन्स यांनी स्पर्धेतील विजेत्या व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा शिक्षकेतर महासंघाचा उद्या जिल्हा मेळावा

**नाशिक ।** महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर महासंघ संलग्न नाशिक जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा शिक्षकेतर महासंघाचा जिल्हा मेळावा तथा सहविचार सभा उद्या (दि.२५) दुपारी दोन वाजता नॅशनल उर्दू हायस्कूल, सारडा सर्कल, नाशिक येथील सभागृहात होणार आहे. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी महासंघाचे राज्याध्यक्ष वाल्मिक सुरासे राहणार असून शिक्षक आमदार किशोर दराडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. आपले काही प्रश्न तथा अडचणी असतील ते सभेत मांडावेत, असे आवाहन नाशिक जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा शिक्षकेतर महासंघाचे जिल्हाध्यक्ष सोमनाथ धात्रक, सचिव लियाकत पठाण, कार्याध्यक्ष संदीप औटे, उपाध्यक्ष जयश्री जोगदंड, भाऊसाहेब बोराडे व जिल्हा पदाधिकारी, तालुकाध्यक्ष यांनी केले आहे.

# जिल्हा वार्षिक योजनेच्या कामांना त्वरीत मंजूरी घ्यावी

### जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या सूचना

**धुळे । प्रतिनिधी**

जिल्हा वार्षिक योजनेतून होणाऱ्या विविध विकास कामांना त्वरीत मंजूरी देवून सदर कामे गतीने पूर्ण होतील यासाठी नियोजन करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिल्यात.

येथील जिल्हा नियोजन सभागृहात जिल्हा वार्षिक योजनेची सर्वसाधारण, आदिवासी उपयोजना, अनुसूचित जाती उपयोजनांची आढावा बैठक जिल्हाधिकारी श्री. गोयल यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली, यावेळी ते बोलत होते. या बैठकीस उपवनसंरक्षक नितीनकुमार सिंग, समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त योगेश पाटील, प्रकल्प



अधिकारी प्रमोद पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी ममता हटकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री.गोयल म्हणाले की, सन २०२३-२०२४ करीता प्राप्त निधीचे तांत्रिक मान्यतेचे प्रस्ताव त्वरीत सादर करुन ते प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करावेत, ज्या यंत्रणेचे जिल्हा वार्षिक योजनेचे प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रे महालेखापाल कार्यालयास अद्यापही सादर केले नाही अशा विभागांनी ती त्वरीत सादर करावीत. ज्या विभागाचा निधी अखर्चित राहणार आहे त्यांनी अखर्चित निधी परत करावा. सर्व यंत्रणेने विकासकामांच्या अंमलबजावणीसाठी योग्य नियोजन करावे. ग्रामपंचायत व नगरपालिका, नगरपंचायतीने नागरीसुविधा, तीर्थक्षेत्र सुविधा तसेच जनसुविधेची कामे प्राधान्याने घ्यावेत. मृद व जलसंधारण विभागाने जलयुक्त शिवार योजनेतून पाझर तलावाची कामे प्रस्तावीत करावीत क्रीडा विभागाने आश्रमशाळा, जिल्हा परिषदेच्या शाळेत क्रीडा साहित्याचे वितरण करावेत. दुर्गम भागातील रस्ते, वीज, तसेच आश्रमशाळा,अंगणवाडी दुरुस्तीची कामे प्राधान्याने करावीत. जिल्हा विकास आराखडयातील निगडीत विभागाने जिल्हा विकास आराखडा सादर केला असून शासनाने या आराखड्यात काही बदल केले असल्याने या आराखड्याशी निगडीत त्या विभागाचे अल्प, मध्यम व दिर्घ मुदतीचे ध्येय निश्र्चित करुन हे ध्येय साध्य करण्यासाठी अंदाजित लागणा-या निधीचे प्रसताव सादर करावेत.आगामी काळात जिल्हा वार्षिक योजनेची विभागीय तसेच राज्यसतरीय बैठक लवकर घेण्यात येणार असल्याने सन २०२४-२०२५ या वर्षांतील जिल्हा वार्षिक योजनेची सर्वसाधारण, आदिवासी उपयोजना, अनुसूचित जाती उपयोजनांचे प्रारुप आराखडा यंत्रणेने त्वरीत सादर करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्यात. जिल्हा नियोजन अधिकारी श्रीमती हटकर तसेच प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील, समाज कल्याणचे सहायक आयुक्त योगेश पाटील यांनी जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत उपलब्ध निधी व खर्चाची माहिती यावेळी दिली. बैठकीत चालू वर्षाचा मंजूर निधी व झालेला खर्च व पुढील वर्षांच्या नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# टिपू सुलतान जयंतीनिमित्त रक्तदान

**धुळे । प्रतिनिधी**

टिपू सुलतान जयंतीनिमित्त टिपू सुलतान सामाजिक क्रीडा संस्थेच्या वतीने गेल्या १३ वर्षापासून अखंड रक्तदान शिबिर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

याहीवर्षी शहरातील शंभर फुटी रस्त्यावरील सोमय्या हॉल परिसरात मंगळवार दिनांक २१ रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आझाद समाज पक्षाचे प्रदेश कार्याध्यक्ष आनंद लोंढे यांच्या हस्ते रक्तदान शिबिर कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन टिपू सुलतान सामाजिक क्रीडा संस्थेचे माजीद खान पठाण यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले. यावेळी जमिर शेख,सलिम



भगवा,हाजी तलाब शेख,गणी डॉलर,आमिर पठाण, निजाम सैय्यद, गुड्डू काजी,इम्रान शेख,बाबु पठाण, नदिम मुल्ला,समिर पठाण, आरिप शेख,रमजान शेख,अकरम अन्सारी, सदाम शाहा,नासिर शेख,जऊर मन्सुरी, शकील अन्सारी, यासीन शेख,शोएब शेख व ग्रुपचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शिवमहापुराण कथेत चोरट्यांनी साधली पर्वणी

**नाशिक ।** पाथर्डी गाव परिसरात पं. प्रदीप मिश्रा यांचा शिवमहापुराण कथा सोहळा सुरू आहे. यासाठी शहरासह परजिल्ह्यातून लाखो भाविक आलेले आहेत. मात्र सोहळ्याच्या पहिल्याच दिवशी चोरट्यांनी संधी साधली असून, गर्दीचा फायदा घेत महिलांच्या गळ्यातील, लहान मुलांच्या कानातील दागिने ओरबाडून लंपास केल्याच्या घटना घडल्या आहेत. पहिल्याच दिवशी १५ महिलांच्या गळ्यातील सुमारे २१ तोळे सोन्याचे दागिने चोरट्यांनी लंपास केल्याचे समोर आले आहे.

# आदर्श: श्री.रामराज्य गणेश मित्र मंडळाने मंदिर बांधकामास केली मदत

**होळनांथे । प्रतिनिधी**

येथील श्री रामराज्य गणेश मित्र मंडळातर्फे गावातच सुरू असलेल्या गणपती मंदिराला देणगी दिली असून मंदिर समितीने त्यांचे आभार व्यक्त केलेत.

श्री रामराज्य गणेश मित्र मंडळ हा लहान मुलांचा ग्रुप असून ते आपल्या खाऊचा पैसा जमा करून गणेश उत्सव साजरा करीत असतात, त्यातच



गावात प्राचीन गणपती मंदिराचे नवीन बांधकाम चालू असून या बालगोपाल मंडळांने दिवाळीत फटाके न फोडता जमा केलेले ३१०० रुपये बांधकाम सुरू असलेल्या गणपती मंदिर समितीकडे दिलेत यावेळी श्री रामराज्य गणेश मित्र मंडळाचे युवराज परदेशी, मृणाल परदेशी, सम्राट परदेशी, पुरुषोत्तम लोहार, हर्षल शिरसाठ आदींची उपस्थिती होती.

# आ. अमरिशभाई पटेल, आ. पावरा,पटेल यांच्या पाठपुराव्याने १७ कोटी २४ लाख रुपयांचा पिकविमा मंजूर

**शिरपूर । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्याचे माजी शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिरामदादा पावरा, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या पाठपुराव्याने १७ कोटी २४ लाख रुपयांचा पिकविमा नुकताच मंजूर झाला आहे.**



पुनर्रचित हवामान आधारित केळी पिक विमा योजना अंतर्गत शिरपूर तालुक्यातील शिरपूर, बोराडी, अर्थे, जवखेडे, होळनांथे, थाळनेर, सांगवी हे सात महसूल मंडळ (सर्कल) मध्ये १७ कोटी २४ लाख रुपयांचा पिक विमा मंजूर झाला असून जवखेडा सर्कलमधील अनेक शेतकऱ्यांच्या खात्यावर एकूण ४१ लाख रुपये जमा झाले आहेत. तसेच उर्वरित सर्कलमधील शेतकरी बांधवांच्या खात्यावर रक्कम जमा होणे बाकी असल्याची माहिती जिल्हा कृषी अधिकारी श्री तडवी, शिरपूर तालुका कृषी अधिकारी श्री साठे व शिरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती के.डी.पाटील यांनी दिली. जवखेडा सर्कल मधील काही शेतकरी तसेच उर्वरित सहा सर्कल मधील शेतकरी बांधवांना अजूनही प्रत्यक्ष लाभ मिळालेला नसून अनेक शेतकरी आर्थिक लाभापासून वंचित आहेत व त्यांच्या खात्यावर रक्कम जमा होण्याच्या ते प्रतीक्षेत आहेत.

केळी (आंबिया बहार) या फळ पिकासाठी कमी तापमान १ नोव्हेंबर ते २८ फेब्रुवारी, वेगाचा वारा १ मार्च ते ३१ जुलै, जादा तापमान १ एप्रिल ते ३१ मे, गारपीट १ जानेवारी ते ३० एप्रिल याप्रमाणे ट्रिगर (प्रमाणाके) नुसार नुकसान भरपाई देण्याबाबत शासन निर्णय आहे. या ट्रिगर नोंदणी नुसार संबंधित नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांना ४५ दिवसाच्या आत विमा रक्कम दिली गेली पाहिजे. पीक विमा कंपनीने संबंध सदर कालावधीत नुकसान भरपाई दिली नाही तर दर साल दर शेकडा १२ टक्के व्याजासकट नुकसान भरपाई देण्याची नोंद शासन निर्णयात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी पी.एम. किसान सन्मान योजनेत शेतकऱ्यांचा हप्ता, केंद्राचा व राज्याचा हप्ता याच शेतकरी बांधवांसाठी संकट काळात ज्या उपायोजना निर्माण केल्या आहेत, त्याची अंमलबजावणी शासनामार्फत किंवा शासकीय अधिकारी यांच्या मार्फत तातडीने होताना दिसून येत नाही. वारंवार कृषी अधिकारी, विमा कंपनी यांच्या प्रतिनिधीकडे दाद मागावी लागते, हे शेतकरी बांधवांसाठी दुर्दैव आहे. झालेले नुकसान क्लायमेट वेदर कंपनीने शासनाने नेमून दिलेल्या निकषाप्रमाणे तापमान, थंडी, वाऱ्याचा वेग, गारपीट यांची प्रमाणके (ट्रिगर) बसवून देखील शेतकरी बांधवांना नुकसान भरपाई तातडीने मिळत नाही. यासाठी शेतकरी बांधवांनी स्वतःचे नुकसान भरपाई पदरात पाडून घेण्यासाठी कोणता मार्ग अवलंबावा असे शिरपूर तालुक्याचे आमदार काशिराम पावरा यांनी विचारणा केली आहे.

# वखार आपल्या दारी कार्यक्रम संपन्न

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,पुणे व नाशिक यांच्या संकल्पनेतुन शिरपुर तालुक्यातील गिधाडे येथील ग्रामपंचायत सभागृहात वखार आपल्या दारी कार्यक्रम नुकसान संपन्न झाला असल्याची माहिती महाराष्ट्र वखार महामंडळाचे कनिष्ठ साठा अधिक्षक एच.बी. सावंत यांनी एका शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

गिधाडे येथे झालेल्या कार्यक्रमास तालुका कृषी अधिकारी चंद्रशेखर साठे, गिधाडे येथील सरपंच डॉ. सुरेश पाटील, उपसरपंच रविंद्र पाटील, माजी सरपंच सौ. आक्काबाई वाघ, माजी उपसरपंच राकेश पाटील, पोलीस पाटील नारायण वाघ, शिक्षक योगेश बागुल, संतोष पाडवी, ग्रामस्थ, महिला, शेतकरी आदि उपस्थित होते. यावेळी श्री.सावंत यांनी शेती उत्पादक करणारे शेतकऱ्यांना शेतमाल साठवणूक व शेतमाल तारण कर्जबाबत तसेच शेतीमाल साठवणुकीतून अल्प व्याजदरात तारण कर्ज व साठवणूक भाड्यामध्ये ५० टक्के सवलत शासनामार्फत देण्यात येत असल्याची माहिती दिली. वखार महामंडळातील डाटा एन्ट्री ऑपरेटर एम.बी.जाधव यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक
शुक्रवार दि. २४ नोव्हेंबर २०२३





# वनबंधू परिषद, एकल ग्राम संघटनेच्या क्रीडा स्पर्धेचा समारोप उत्साहात

## नाशिक येथे करण्यात आले होते आयोजन




























नाशिक । वनबंधू परिषद आणि एकल ग्राम संघटनतर्फे नाशिक येथे दि.२१ व २२ नोव्हेंबर रोजी क्रीडा स्पर्धेच्या समारोपाप्रसंगी अध्यक्षस्थानी रवी महाजन होते. यावेळी श्रीनिवास लोया, राहुल मुखेडकर, विवेक करवीर, सुनील चांडक, अशोक तापडीया, राजन लोंढे, शिरीष गुरव, महादेव घोडके, आशा कुलकर्णी, मंजुषा डहाळे, पुष्पा गोटखिंडीकर, रत्ना तापडीया, ऋतुजा लोंढे आदींच्या हस्ते विजेत्या खेळाडूंना पुरस्कार प्रदान करण्यात आले. या स्पर्धेतील विजयी खेळाडू हे पुढीलप्रमाणे आहेत. त्यात कबड्डी (मुले) - गोंदिया संघ, कबड्डी (मुली) - नाशिक संघ,१०० मीटर धावणे (मुले)- चेतन पावरा, समाधान माळी, मानस सहारे आदी. तर १०० मीटर धावणे (मुली)- श्रेया सुदेवाद, आरती सहारे, रितू पगरवार, २०० मीटर धावणे (मुले)- रतन बरमल, सुमित काजदेकर, रोहित लिल्होरे. २०० मीटर धावणे (मुली)- अंजन वसावे, प्रियांका किरकिरा, भरती चौधरी. ४०० मीटर धावणे (मुले)- युसुफ लांजे, जयंत राय, प्रतीक धनगरे. ४०० मीटर धावणे (मुली)- सानिका चौधरी, सुरभी पावरा, वैष्णवी गिरपुंजे. लांब उडी (मुले)- जयंत राय, निखिल मावसकर, ज्ञानेश्र्वर टेकाम. लांब उडी (मुली)- निकिता घरेल, मुक्ताई इजेपवाड, अंजना वसावे. उंच उडी (मुले)- अजय भुक्या, जयेश खरपडे, शशिकांत मुरापे. उंच उडी (मुली) - गौरी वाघ, ईशा वालदे, अंजना वसावे. कुस्ती ४५ किलो - भावेश वारघडे, घोटी. कुस्ती ४८ किलो - गौरव वारघडे, घोटी. कुस्ती ५१ किलो - विक्रम कुंडे, नाशिक. कुस्ती ५५ किलो - साहिल दाते, परतवाढा. योगासने (मुले) - तानाजी अस्वले, महेश पारधी, रतन बरमल. योगासने (मुली)- ज्योत्स्ना वागळे आदी विजयी खेळाडू आहेत अशी माहिती शैलेंद्र साळी यांनी दिली.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक
गुरुवार, दि. २३ नोव्हेंबर २०२३





# नांदुरमध्यमेश्वर अभयारण्यात भरले पक्ष्यांचे हिवाळी अधिवेशन

## नाशिक मधील पक्षी प्रगणनेत आढळले १६६६० पक्षी





























धुळे । महाराष्ट्राचे 'भरतपूर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नांदुरमध्यमेश्वर पक्षी अभयारण्यात थंडी पडायला सुरुवात होताच देश विदेशातील परदेशी पक्षी दाखल झाले आहेत.धरणामुळे या ठिकाणी सकाळच्या वेळी पक्षाचा किलबिलाट ऐकण्यास येत आहे.पक्षी दाखल झाल्याने अनेक पक्षी प्रेमी,पर्यटक सुट्टीच्या दिवशी अभयारण्यात पक्षी निरीक्षणासाठी गर्दी करत आहेत. दि.५ नोव्हेंबर २०२३ रोजी पक्षी सप्ताह निमित्ताने पक्षी हंगामातील पक्षी प्रगणना क्र.२ सकाळी ७.३०ते १०.३० या वेळेत करण्यात आली.या प्रगणनेत चापडगाव,मांजरगाव,खानगावथडी,नांदुरमध्यमेश्र्वर गोदावरी नदी पात्र,कोठुरे,कुरडगाव,काथरगाव अशा सात ठिकाणी पक्षी निरीक्षणात विविध प्रकारच्या पाणपक्षी १०९३० व झाडावरील गवताळ भागातील पक्षी ५७४० असे एकुण १६६६० पक्षाची नोंद करण्यात आली. बार हेड,गुज,ऑस्प्रे,कॉमन क्रेन,मार्शहरीहर,कॉमन पोटार्ड,पोलीस हरिहर,ग्रेटर,स्पॉटेडहगल,गाग्ररनी तसेच स्थानिक पक्षी आढळुन आले.पक्षी सप्ताह निमित्ताने बी.एन.एच.एस संस्थेमार्फत एकता शेखावत,अनन्या अग्निहोत्री,आशुतोष मिश्रा,निखिल घाडीगावकर, अभिनव नायर यांनी पक्षी विषयक प्रशिक्षण दिले. जात,पंथ,वर्ण,पक्ष भेद विसरून हे पक्षी अभयारण्य परिसरात मुक्त विहार करताना आणि गटागटाने दिसू लागले आहेत.